ePaper

वर्ष - 9 । अंक - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । रविवार, दि. 24 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मी मटण खाल्लं तर माझ्या पांडुरंगाला चालतं, सुप्रिया सुळेंच विधान चर्चेत!



### आतील पानांत


- रोहित कर्णधार, गिलला विश्रांती!
- वीरेंद्र सेहवागची मोठी भविष्यवाणी!
- अमेरिकेतील स्थलांतरितांच्या संख्येत घट
- तुम्हाला कोणी जबरदस्ती केली


### देशांतर्गत उद्योगांना चालना देण्याचा संकल्प

### भाजपचे ‘स्वदेशी जागरण अभियान’

# ट्रम्पच्या टॅरिफला ठोस प्रत्युत्तर!

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या ५०% शुल्कवाढीला प्रत्युत्तर देत भाजपचा स्वदेशीचा बिगुल



। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के कर लावण्याची घोषणा केल्यानंतर भाजपने मोठी चाल खेळली आहे. या निर्णयाला प्रत्युत्तर देत भाजपने ‘स्वदेशी जागरण अभियान’ हाती घेण्याचा निर्णय घेतला असून देशात ‘व्होकल फॉर लोकल’ मोहिमेचा नवा टप्पा सुरू होणार आहे.**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी पक्षाच्या सरचिटणीसांसोबत घेतलेल्या बैठकीत ही मोहीम अधिक व्यापक करण्याचे ठरवले. याआधी १९ आणि २० ऑगस्ट रोजी सरसंघचालक मोहन भागवत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आरएसएस बैठकीत स्वदेशी वस्तूंना प्रोत्साहन देण्याचा निर्णय झाला होता. भाजप संघटन सरचिटणीस बीएल संतोष आणि अरुण सिंह यांनीही या बैठकीत सहभाग घेतला होता. त्यात शेतकऱ्यांच्या उत्पादनांना आणि लघु-मध्यम उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी रणनीती तयार करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वावलंबनावर भर दिल्यानंतर आता भाजप देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी स्वदेशीचा वापर वाढवणार आहे. जे.पी. नड्डा यांनी पक्ष कार्यकर्त्यांना आवाहन केले की, “देशातील उत्पादनच देशात विकले जावे, निर्यात कमी होऊन अमेरिकन कराचा फटका मर्यादित राहावा, हेच आमचे उद्दिष्ट आहे.”

#### भाजप-आरएसएसची ‘स्वदेशी क्रांती’ मोहीम सुरू!

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के कर लावण्याची घोषणा केल्यानंतर आता भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) यांनी देशांतर्गत खप वाढवण्यासाठी मोठा उपक्रम हाती घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत ‘व्होकल फॉर लोकल’ उपक्रमाला नवी गती देण्यात येणार असून, देशांतर्गत वस्तूंच्या वापराला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

१९ आणि २० ऑगस्ट रोजी संघ प्रमुख मोहन भागवत यांच्या नेतृत्वाखाली झंडेवालान कार्यालयात झालेल्या आरएसएसच्या बैठकीत हा निर्णय झाला. या बैठकीस आरएसएसच्या संलग्न संघटनांचे प्रतिनिधी तसेच भाजपचे दोन वरिष्ठ नेते उपस्थित होते. या चर्चेनंतर लगेचच २१ ऑगस्ट रोजी भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी महामंत्र्यांची बैठक घेतली आणि ‘व्होकल फॉर लोकल’ मोहिम राबविण्यासाठी पावले उचलण्याचे आदेश दिले. या मोहिमेमुळे देशांतर्गत खप वाढवण्यास हातभार लागेल व अमेरिकन टॅरिफचा फटका काही प्रमाणात कमी होईल, असा भाजपचा विश्वास आहे.

#### आत्मनिर्भर भारताचा पंतप्रधानांनी घेतला संकल्प

लक्ष देण्यासारखी बाब म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवरील आयातशुल्क २५ टक्के लावण्याची घोषणा केली आहे. त्यासोबतच रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे २५ टक्के अतिरिक्त दंडही आकारला जाणार आहे, जो २७ ऑगस्टपासून लागू होईल. आधीच लागू असलेल्या शुल्कासह एकत्रित केल्यास हे सरासरी ६०–६५ टक्क्यांपर्यंत पोहोचते.

### अमेरिकेच्या ५०% करवाढीचा परिणाम

- भाजपची धडाडीची पावले : ‘स्वदेशी जागरण अभियान’ आणि ‘व्होकल फॉर लोकल’ मोहिमेला गती देण्याचा निर्णय.
- बैठकांचा मॅरेथॉन : जे.पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली सरचिटणीसांची बैठक; आरएसएसच्या मार्गदर्शनानंतर अंतिम रणनीती ठरली.
- शेतकरी व लघु उद्योगांना चालना : संघटनांना शेतकऱ्यांच्या उत्पादनांना आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन.
- पंतप्रधानांचे स्वावलंबनाचे आवाहन : १५ ऑगस्टच्या भाषणानंतर आत्मनिर्भर भारतासाठी भाजप कार्यकर्त्यांना सक्रिय होण्याचे निर्देश.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवारांची चौफेर फटकेबाजी

# ज्याचे फ्लेक्स जास्त त्याचं बटन दाबू नका!

## आता हा टोला नेमका कोणाला?

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी चौफेर फटकेबाजी करत जोरदार भाषण केल आहे. ज्या नेत्यांचे, पदाधिकाऱ्यांचे फ्लेक्स जास्त त्यांच आगामी निवडणुकांमध्ये बटन दाबू नका. असा सल्ला अजित पवारांनी पिंपरी-चिंचवडकरांना दिला आहे. आता हा टोला नेमका कोणाला आहे. यावरून चर्चा रंगली आहे. फ्लेक्समुळे अपघात होतात. छान फलक असल्यास त्याकडे वाहनचालक बघतो आणि अपघात होतो. अस ही अजित पवारांनी म्हटलं आहे. ते पिंपरी – चिंचवड महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यक्रमात बोलत होते.**



अजित पवारांनी आज चौफेर फटकेबाजी केली. मी बीडचा पालकमंत्री आहे. तिथले नागरिक म्हणतात तुम्ही अधून-मधून बीड चा दौरा काढत जा. त्यामुळं शहर स्वच्छ होत. शहर स्वच्छ झालं की समजायचं अजित पवार येत आहेत. अशी टोलेबाजी अजित पवारांनी केली. पुढे ते म्हणाले, एक वेळ स्वच्छतेवरून स्वर्गीय आर. आर. पाटील यांच्यावर चिडलो होतो. ते मला स्वच्छते संदर्भात सांगायचे. पण ते सिंगापूरमध्ये एक आणि मुंबई विमानतळावर वेगळं वागायचे. पुढे ते म्हणाले, परदेशात आपण नियम पाळतो. मग आपल्या देशात का? नाही. तिथं कचरा टाकला की चक्की पिसावी लागते.पुढे ते म्हणाले, बारामतीत अनधिकृत फ्लेक्स लावू नका. अस आम्ही परिपत्रक काढलं आहे. ज्याने फ्लेक्स लावला आणि ज्याचे ते फ्लेक्सचे बांबू आहेत. त्या दोघांवर गुन्हा दाखल केला जात आहे. तसा त्यांचा बंदोबस्त केला जातो. पिंपरी- चिंचवड शहरात ही तस धोरण राबवा. अस आवाहन अजित पवार यांनी आयुक्त शेखर सिंह यांना केलं. मग तो फ्लेक्स देवेंद्र भाऊ यांच्या असो की अजित पवारांचा. काही जण स्वतःचा फोटो मोठा दिसावा म्हणून आमचे फ्लेक्स लावतात. जो जास्त काम करतो, त्याचे फ्लेक्स कमी असतात आणि जो कामच करत नाही. त्याचे फ्लेक्स जास्त असतात. आता फ्लेक्स जास्त त्याच बटन दाबू नका. असा सल्ला अजित पवारांनी पिंपरी-चिंचवडकरांना दिला आहे. पुढे ते म्हणाले, प्लास्टिकवर बंदी आणावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगत आहे. प्लास्टिकमुळे पुरात चोअप होत. लोणावळा, माथेरान इथं प्लास्टिक बंदी आहे. प्लास्टिकमधील पाणी प्यायल्याने आरोग्यासाठी घातक आहे. आजार उद्भवतात अस ही अजित पवारांनी सांगितलं.अजित पवारांनी आज चौफेर फटकेबाजी केली. मी बीडचा पालकमंत्री आहे. तिथले नागरिक म्हणतात तुम्ही अधून- मधून बीड चा दौरा काढत जा. त्यामुळं शहर स्वच्छ होत. शहर स्वच्छ झालं की समजायचं अजित पवार येत आहेत. अशी टोलेबाजी अजित पवारांनी केली. पुढे ते म्हणाले, एक वेळ स्वच्छतेवरून स्वर्गीय आर. आर. पाटील यांच्यावर चिडलो होतो. ते मला स्वच्छते संदर्भात सांगायचे. पण ते सिंगापूरमध्ये एक आणि मुंबई विमानतळावर वेगळं वागायचे. पुढे ते म्हणाले, परदेशात आपण नियम पाळतो. मग आपल्या देशात का? नाही. तिथं कचरा टाकला की चक्की पिसावी लागते.पुढे ते म्हणाले, बारामतीत अनधिकृत फ्लेक्स लावू नका. अस आम्ही परिपत्रक काढलं आहे. ज्याने फ्लेक्स लावला आणि ज्याचे ते फ्लेक्सचे बांबू आहेत. त्या दोघांवर गुन्हा दाखल केला जात आहे. तसा त्यांचा बंदोबस्त केला जातो. पिंपरी- चिंचवड शहरात ही तस धोरण राबवा. अस आवाहन अजित पवार यांनी आयुक्त शेखर सिंह यांना केलं. मग तो फ्लेक्स देवेंद्र भाऊ यांच्या असो की अजित पवारांचा. काही जण स्वतःचा फोटो मोठा दिसावा म्हणून आमचे फ्लेक्स लावतात. जो जास्त काम करतो, त्याचे फ्लेक्स कमी असतात आणि जो कामच करत नाही. त्याचे फ्लेक्स जास्त असतात. आता फ्लेक्स जास्त त्याच बटन दाबू नका. असा सल्ला अजित पवारांनी पिंपरी-चिंचवडकरांना दिला आहे.

### मी बीडचा पालकमंत्री आहे

पुढे ते म्हणाले, प्लास्टिकवर बंदी आणावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगत आहे. प्लास्टिकमुळे पुरात चोअप होत. लोणावळा, माथेरान इथं प्लास्टिक बंदी आहे. प्लास्टिकमधील पाणी प्यायल्याने आरोग्यासाठी घातक आहे. आजार उद्भवतात अस ही अजित पवारांनी सांगितलं.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी चौफेर फटकेबाजी करत जोरदार भाषण केल आहे.

# पुणे, पिंपरीत घर विकत घ्यायचंय?

## कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या घरांना मागणी वाढल्याचे दिसून आले

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे, पिंपरी चिंचवडसह जिल्ह्यातील ग्रामीण भागात जुलै महिन्यात १४ हजार ६२२ घरांच्या विक्री व्यवहारांची नोंद झाली आहे. घरांच्या विक्रीत परवडणाऱ्या घरांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असून, ते ५६ टक्क्यांवर आले आहे. याचवेळी एक कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या घरांना मागणी वाढल्याचे दिसून आले आहे.**



पुण्यातील मालमत्ता क्षेत्राचा अहवाल नाइट फ्रँक इंडियाने जाहीर केला आहे. या अहवालानुसार, पुण्यात जुलैमध्ये १४ हजार ६२२ घरांची विक्री झाली. गेल्या वर्षातील जूनच्या तुलनेत यात ६ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. मात्र, यंदाच्या जूनच्या तुलनेत त्यात १२ टक्के घट झालेली आहे. घरांच्या विक्री व्यवहारातून सरकारला जुलैमध्ये ६४८ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क मिळाले आहे. गेल्या वर्षातील याच कालावधीच्या तुलनेत त्यात २४ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे.

यंदा जानेवारी ते जुलै कालावधीत एकूण १ लाख ३० हजार घरांचे विक्री व्यवहार झाले असून, त्यातून ४ हजार ९८३ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क सरकारला मिळाला आहे

पुण्यात जुलैमध्ये विक्री झालेल्या घरांमध्ये २५ लाख रुपयांपर्यंतच्या आणि २५ ते ५० लाख रुपये किमतीच्या घरांचे प्रमाण प्रत्येकी २८ टक्के आहे. सर्वसाधारणपणे ५० लाख रुपयांपर्यंत किंमत असलेली घरे परवडणारी मानली जातात. त्यामुळे जुलैमध्ये एकूण विक्रीत परवडणाऱ्या घरांचे प्रमाण ५६ टक्के आहे. गेल्या वर्षातील याच महिन्यात हे प्रमाण ५९ टक्के होते. त्यात आता ३ टक्के घट नोंदविण्यात आली.

### १४ हजार ६२२ घरांची विक्री

घरांच्या एकूण विक्रीत ५० लाख ते १ कोटी रुपये किमतीच्या घरांचे प्रमाण २७ टक्क्यांवर कायम आहे. मात्र, १ ते २.५ कोटी रुपये किमतीच्या घरांचे प्रमाण १४ टक्क्यांवर पोहोचले आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ते १२ टक्के होते. तसेच, २.५ ते ५ कोटी रुपये आणि ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या घरांचे प्रमाण अनुक्रमे २ टक्के आणि १ टक्के आहे, असे अहवालात म्हटले आहे.

वातावरण तापले

## २०१७ मधील प्रभागरचना पुन्हा लागू करत असल्याची घोषणा

# सत्ताधाऱ्यांचा फायदा, विरोधक आक्रमक

## पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा जुनी प्रभागरचना लागू करण्याचा निर्णय

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जुनीच प्रभागरचना लागू करण्याचा निर्णय घेतल्याने शहरातील राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. प्रशासनाने २०१७ मधील प्रभागरचना पुन्हा लागू करत असल्याची घोषणा केली असून, यामुळे सत्ताधारी भाजपला पुन्हा एकदा फायदा होईल, असा आरोप विरोधकांनी केला आहे.**




२०१७ च्या निवडणुकांमध्ये भाजपने मोठ्या प्रमाणावर जागा जिंकून सत्ता मिळवली होती. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या प्रभागरचनेचा फायदा त्यांना झाला होता. आता पुन्हा तीच रचना लागू केल्यास, भाजपचा विजय निश्चित करण्याचा डाव असल्याची चर्चा आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि इतर विरोधकांनी या निर्णयाला जोरदार विरोध दर्शवला आहे. त्यांचा दावा आहे की नव्या जनगणनेनुसार आणि वाढलेल्या लोकसंख्येच्या आधारे नवीन प्रभागरचना करणे गरजेचे होते. जुनी रचना ही आजच्या सामाजिक-राजकीय वास्तवाला साजेशी नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

**नवे इच्छुक निवडणुकीच्या रिंगणात**

कोरोना महामारी, ओबीसी आरक्षण, सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहचलेला वाद व इतर कारणांमुळे महापालिकेची निवडणुकीत मुदतीमध्ये झाली नाही. त्यामुळे महापालिकेत १३ मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. निवडणूक लवकरच होणार, असे सांगितले जात असल्याने माजी नगरसेवक व इच्छुक आपल्या प्रभागात सक्रिय होते. वर्षभर विविध कार्यक्रम घेतले जात होते. मात्र, निवडणुका पुढे पुढे ढकलल्या जात असल्याने अनेक माजी नगरसेवकांनी संपर्क कार्यालये बंद करन शांत राहणे पसंत केले होते. त्याचा फायदा घेत शहरातील सर्वच प्रभागात अनेक नवे इच्छुक तयार झाले. प्रशासकीय राजवटीच्या साडेतीन वर्षांच्या कालावधीत कार्यकर्त्यांसह इच्छुकांची भर पडली आहे. त्यांनी प्रभागात जनसंपर्क वाढवून, माजी नगरसेवकांना आव्हान निर्माण केले आहे. त्यामुळे प्रमुख पक्षाकडे विशेषतः सत्तेतील पक्षाकडे इच्छुकांची संख्या वाढली आहे. एका एका प्रभागात उमेदवारीवरून तीव्र स्पर्धा निर्माण झाल्याचे दिसत आहे. तिकीटासाठी वरिष्ठ नेत्यांसह स्थानिक लोकप्रतिनिधींकडे मोर्चेबांधणी केली जात आहे. इच्छुकांच्या वाढत्या संख्येमुळे कार्ड कमिटीसमोर उमेदवारीबाबत पेच निर्माण होऊ शकतो. तर, काही पक्षाकडे संपूर्ण शहरात १२८ उमेदवार शोधण्याची वेळ येणार आहे.

### फेब्रुवारी २०१७ च्या निवडणूक निकालानुसार पक्षीय बलाबल

| पक्ष | नगरसेवक |
| --- | --- |
| भाजप | ७७ |
| राष्ट्रवादी काँग्रेस (एकसंघ) | ३६ |
| शिवसेना (एकसंघ) | ९ |
| अपक्ष | 4 |
| मनसे | १ |

### मतदारांची भूमिका निर्णायक ठरणार

या सर्व घडामोडींमध्ये मतदारच निर्णायक ठरणार आहेत. जुन्या प्रभागरचनेला जनता कितपत स्वीकारते, आणि याचा नेमका फायदा कोणाला होतो, हे आगामी निवडणुकांमध्ये स्पष्ट होईल.

# स्वच्छ सर्वेक्षणात अव्वलतेसाठी संयुक्त प्रयत्नांची गरज

## अजित पवार : स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 साठी महापालिका व नागरिकांचा संयुक्त संकल्प

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहर हे केवळ औद्योगिक नगरी राहू नये, तर स्वच्छ, हरित व समृद्ध शहर म्हणून ओळख मिळवावी," असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये शहराला अव्वल स्थान मिळवण्यासाठी महापालिकेसोबत लोकप्रतिनिधी, नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.**



भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत राबवण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड शहराने देशात सातवा तर राज्यात पहिला क्रमांक मिळवला. याशिवाय शहराला ७ स्टार कचरामुक्त शहर आणि वॉटर-प्लस प्रमाणपत्रही प्राप्त झाले. या यशस्वी कामगिरीसाठी महापालिकेला केंद्र सरकारकडून पुरस्कारही देण्यात आला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या तयारीचा प्रारंभ आणि योगदान देणाऱ्यांचा सन्मान सोहळा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडला.

**स्वच्छतेची सुरुवात प्रत्येक घरातून**

पिंपरी चिंचवड शहरात दररोज १,४०० टन कचरा निर्माण होतो. "लोकसंख्या वाढत आहे, शहरीकरण वेगाने होत आहे, त्यात स्वच्छतेलाही प्राधान्य द्यायला हवे. आपण परदेशात नियम पाळतो, मग आपल्या मातृभूमीत का नाही? दंडाची भीती नव्हे, तर जबाबदारीची जाणीव ठेवून प्रत्येकाने स्वतःपासून स्वच्छतेची सुरुवात केली पाहिजे," असे पवार म्हणाले.


**नवीन प्रकल्पांचे अनावरण**

या कार्यक्रमात आर.आर. आर. सेंटर डॅशबोर्ड प्रणाली, शून्य कचरा प्रकल्प, स्वच्छ शौचालय ॲप, स्वच्छता सर्वेक्षण मॅस्कॉट व घोषवाक्य तसेच हरित सेतू प्रकल्पाचे बोधचिन्ह यांचे अनावरण करण्यात आले.

### महत्वाच्या उपस्थिती

या कार्यक्रमाला विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, आयुक्त शेखर सिंह, माजी महापौर योगेश बहल, माजी उपमहापौर राजू मिसाळ यांच्यासह अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### परमार्थ कसा साधेल.

ज्याच्यापासून माया उत्पन्न झाली, त्याला शरण जावे. त्याला शरण जाण्याच्या आड काय येते ते पाहावे. कर्तेपण टाका म्हणजे शरण जाता येते. माझेपणाने मिरविता आणि अभिमान कायम ठेवता, मग भगवंताला शरण कसे जाता येईल ? आपण संताच्या दर्शनाला जातो, आणि बायकोचे दुखणे बरे व्हावे असे म्हणतो; मग ते दर्शन खरे झाले म्हणायचे का ? पोराबाळांकरता, बायकोकरता, संतांकडे नाही जाऊ. संतांनी नामस्मरण करायला सांगितले, परंतु मुलगा वाचत नाही असे पाहिले की आपली रामावरची, नामस्मरणावरची, श्रद्धा उडते म्हणजे मी विषयाकरिता नाम घेतो असेच झाले ! विषय सुटावेत असे वाटते, पण ते सुटतच नाहीत. याचे कारण आमची बलवत्तर इच्छाच नसते. संन्यास घ्यायला निघाला तर बायको पोर घेऊन आडवी येते; तिला दूर सारून निघाला, पण पुढे मोहात पडून परस्त्री करण्याची वेळ येते ! माणूस व्यसनाकरिता हे सर्व करतो, परंतु परमार्थाकरिता विषय आणि मोह दूर करून साधन कर म्हटले, तर निरनिराळ्या सबबी आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. चोवीस वर्षे अभ्यास केला तरी पोटभर खायला मिळत नाही, मग परमार्थ मात्र दोन वर्षांत साध्य व्हावा असे कसे म्हणावे ?

शांती ही परमार्थाची पहिली पायरी आहे. परमार्थ हा समजुतीचा आहे, उगीच कष्ट करण्याचा किंवा पारायणाचा नाही. बद्रीनारायणाची यात्रा करूनही तो साधणार नाही. त्यापेक्षा भगवंताच्या अनुसंधानात राहिल्याने जास्त फायदा होईल. काही खेळ जसे एकट्यानेच खेळायचे असतात, तसा परमार्थ हा आपल्याशीच करायचा खेळ आहे. तो आपल्याशीच करायचा अभ्यास आहे. खेळात काही बाह्य साधन तरी लागते, पण या अभ्यासात त्याचीही जरुरी नसते. परमार्थ हा वृत्ती सुधारण्याचा अभ्यास आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थक नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. अंतर्यामी स्थिर होणे, स्वस्थता येणे, सावधानता ठेवणे, दगदग सोडणे हाच परमार्थ होय. सतत आनंद मिळावा यासाठी प्रयत्न करणे, याचेच नाव परमार्थ. ' जग काय म्हणेल ' म्हणून वागणे याचे नाव व्यवहार आणि ' भगवंत काय म्हणेल ' म्हणून वागणे हाच परमार्थ.

बोधवचन:- कर्तव्यात भगवंताचे स्मरण हेच परमार्थाचे सार.



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लावण्याचा घेतलेला निर्णय आणि त्यानंतर सर्जियो गोर यांची भारतातील राजदूतपदी नियुक्ती — हे दोन्ही निर्णय भारत-अमेरिका संबंधांच्या नव्या वळणाचे संकेत देणारे ठरू शकतात. जागतिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या या घडामोडी केवळ व्यापारापुरत्याच मर्यादित नाहीत, तर त्या दोन मोठ्या लोकशाही राष्ट्रांमधील विश्वास, सामंजस्य आणि भविष्यातील धोरणात्मक दृष्टीकोनावरही प्रभाव टाकणाऱ्या आहेत.**

# अमेरिका-भारत व्यापार तणाव नव्या पर्वाची सुरुवात की जुन्या मैत्रीत दुरावा?



### टॅरिफ लावण्यामागचं राजकारण

भारताने रशियाकडून स्वस्त दरात कच्चं तेल खरेदी सुरू ठेवले यामुळे अमेरिकेची नाराजी लपून राहिलेली नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा व्यापार तणाव वाढवण्याची भूमिका घेत, भारतावर ५०% टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय केवळ आर्थिक नाही, तर त्यामागे स्पष्टपणे एक भूराजकीय दबाव तंत्र आहे. भारताला रशियापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न हे त्याचे मूळ आहे. मात्र भारताने अमेरिका यांच्या या मागणीला स्पष्टपणे नकार देत, आपल्या ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य दिले, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

### सर्जियो गोर यांची नियुक्ती – एक संदेश

ट्रम्प प्रशासनाने ३८ वर्षीय सर्जियो गोर यांना भारतातील राजदूत म्हणून निवडल्याची घोषणा केली आहे. राजनैतिक पार्श्वभूमी नसलेल्या आणि भारताशी फारसा थेट अनुभव नसलेल्या व्यक्तीची ही निवड अनेक प्रश्न उपस्थित करते. मात्र अमेरिकेच्या राजकारणात "राजदूत म्हणजे राष्ट्राध्यक्षाचा प्रतिनिधी" ही संकल्पना नवीन नाही. ट्रम्प यांच्या दृष्टिकोनातून ही नियुक्ती म्हणजे भारताला दिलेला स्पष्ट संकेत आहे – आता वाटाघाटी थेट उच्च स्तरावर होतील.

### भारताची भूमिका – आत्मनिर्भर धोरण आणि जागतिक संतुलन

भारताने रशियासोबतचा ऊर्जा व्यवहार सुरू ठेवत, स्वाभिमानी आणि स्वतंत्र परराष्ट्र धोरण दाखवले आहे. भारताची ही भूमिका केवळ एका देशाला साथ देण्यापुरती मर्यादित नाही, तर ती जागतिक साम्यतेचा विचार करणारी, बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेला पाठिंबा देणारी आहे. अमेरिकेच्या टॅरिफ निर्णयानंतर रशिया आणि चीनने भारतीय उत्पादने आपल्या बाजारात सामावून घेण्याची तयारी दाखवली आहे. ही संधी भारतासाठी नव्या बाजारपेठा निर्माण करण्याची आणि निर्यातीला चालना देण्याची आहे.

### पुढचा मार्ग – संवाद, सामंजस्य आणि समन्वय

अमेरिका आणि भारत हे दोन्ही देश जागतिक राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतात. तणाव वाढवणे हे कुणाच्याच हिताचे नाही. भारताने आतापर्यंत संयमित भूमिका घेतली आहे आणि भविष्याचाही तोच मार्ग असावा. ट्रम्प यांचा उद्देश जर थेट राष्ट्राध्यक्ष स्तरावर संवाद सुरू करण्याचा असेल, तर भारतानेही ही संधी धोरणात्मक चर्चेसाठी वापरावी. यामुळे द्विपक्षीय संबंधांना स्थैर्य मिळेल आणि व्यापार तणावाचे रूपांतर विकासाच्या संधींमध्ये होऊ शकते.डोनाल्ड ट्रम्प यांची टॅरिफ धोरणे आणि राजदूतपदाची नियुक्ती हे राजकारणाचे एकच नाणे आहे – दबाव आणि संवादाचा खेळ. भारताने आजवर आपली जागतिक भूमिका जबाबदारीने पार पाडली आहे. नव्या टप्प्यावर प्रवेश करत असताना भारताने आत्मविश्वास आणि समन्वय यांच्यात योग्य तो समतोल साधणे गरजेचे आहे. अमेरिका-भारत संबंधांमध्ये हा तणाव एक संधी ठरू शकतो – परस्पर सामंजस्य वाढवण्यासाठी आणि जागतिक व्यासपीठावर नव्या सहकार्याचा प्रारंभ करण्यासाठी...!

### सध्याची परिस्थिती :

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 1 ऑगस्टपासून भारतीय आयातीवर 25% कर लावला, आणि 27 ऑगस्टपासून रशियाचे तेल खरेदी करणाऱ्यांवर 25% अतिरिक्त दंडात्मक शुल्क लागू होणार आहे—एकूण सरासरी करदर जवळपास 50% वर पोहोचला आहे.

या निर्णयामुळे अमेरिकेसोबतचे व्यापारही पाहिजे तितके गुळगुळीत चालू राहणे कठीण झाले आहे. भारताने संयुक्त व्यापार चर्चासमवेत आपली शेतकरी आणि लघु उत्पादकांसाठी "RED LINES" (अडगळीच्या मुद्द्यांचा) स्पष्ट केला आहे. व्यापार तटस्थ राहण्याऐवजी, या तणावामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील दीर्घकालीन धोरणात्मक सहकार्याला धक्का बसण्याची शक्यता आहे.

### "नवीन पर्वाची सुरुवात" की "जुनी मैत्रीत दरारा"?

न्यूज फॅशनेल कॉल म्हणून हे गोष्टी पाहता, ट्रम्पचे टॅरिफ धोरणाग्रस्त आणि असहिष्णु असल्याचे महाराष्ट्राच्या परराष्ट्रमंत्री जयशंकरांनी स्पष्टपणे सांगितले आहे. या तणावाच्या काळातच भारताने चीन आणि रशियाशी संबंध घट्ट करताना "MULTIPOLAR WORLD" मध्ये आपल्या भूमिकेला बळ दिले आहे. "जुन्या मैत्रीत दरारा" म्हणावा असा संदर्भ वास्तविक वाटतो. कारण दोन दशकांच्या सामरिक आणि व्यापारिक पूरवठीची धारे अंतर्गत आक्षेपासून ढगळली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

बदनामीचे राजकारण

## देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींना फटकारले

# बिहारमध्ये जाऊन महाराष्ट्राची बदनामी!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र महिला भाजपाने मुंबईत ‘आपला भाऊ, देवा भाऊ’ हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी राज्यभरातील महिलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लाखो राख्या पाठवल्या होत्या. दरम्यान, या कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील महिलांमुळेच आपण सत्तेत असल्याचे आणि महिलांनी भरभरून मते दिल्याचे म्हटले आहे.**

## राज्यातील महिलांमुळेच आपण सत्तेत





### बिहारमध्ये जाऊन बदनामी

तर यांच्यापेक्षा मोठे चोर कोण असतील?”राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी झाल्याचा आरोप केला होता. आता बिहारमध्ये जाऊन महाराष्ट्राची बदनामी करत आहेत. पण यांना ना परदेशात कोणी विचारले, ना बिहारमध्ये कोणी विचारेल. जी परिस्थिती यांची महाराष्ट्रात झाली, तीच परिस्थिती बिहारमध्ये होणार आहे.

याचबरोबर, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी करत असलेल्या मतचोरीच्या आरोपांवरही त्यांनी टीका केली. फडणवीस यांनी राहुल गांधी यांचे नाव न घेता म्हटले की, “ते आधी परदेशात जाऊन भारताची बदनामी करायचे, आता बिहारमध्ये जाऊन महाराष्ट्राची बदनामी करत आहेत.”या कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले की, “महिलांसाठी आपण अनेक वेगवेगळ्या योजना सुरू केल्या. काही लोक म्हणायचे की या योजना निवडणुकीपूर्वीच आहेत आणि निवडणूक संपल्यानंतर या योजना बंद होतील. निवडणूक होऊन अनेक महिने झाले, तरीही या योजना अजूनही सुरूच आहेत. यातील एकही योजना पुढील पाच वर्षांत आम्ही बंद होऊ देणार नाही. तुमच्या आशीर्वादामुळेच आम्हाला यश मिळाले.”ते पुढे म्हणाले की, “या यशामुळे तुम्ही आनंदी आहात, पण काही जणांचे अजूनही समाधान झालेले नाही. हे रोज मतचोरी झाल्याचे म्हणतात. मतचोरी नाही, तर यांचेच डोके चोरीला गेले आहे. बहिणींना विनंती आहे की, यांना अक्कल यावी यासाठी त्यांच्यासाठीही आशीर्वाद मागा. आमच्या लाडक्या बहिणींच्या मतांना जर हे चोरी म्हणत असतील, तर यांच्यापेक्षा मोठे चोर कोण असतील?”राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी झाल्याचा आरोप केला होता. यावर नाव न घेता टीका करताना फडणवीस म्हणाले, “कालपर्यंत हे परदेशात जाऊन भारताची बदनामी करत होते. आता बिहारमध्ये जाऊन महाराष्ट्राची बदनामी करत आहेत. पण यांना ना परदेशात कोणी विचारले, ना बिहारमध्ये कोणी विचारेल. जी परिस्थिती यांची महाराष्ट्रात झाली, तीच परिस्थिती बिहारमध्ये होणार आहे.”केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मदतीने भाजपाने देशभरात निवडणुकांमध्ये गैरप्रकार केले असून या ‘मतचोरां’ना केंद्र आणि बिहारच्या सत्तेतून खाली खेचा, असे आवाहन करण्यासाठी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह ‘महागठबंधन’च्या नेत्यांनी ‘व्होटर अधिकार यात्रे’ला सुरुवात केली आहे. या यात्रेत राहुल गांधी सातत्याने महाराष्ट्राच्या निवडणुकांमध्ये गैरप्रकार झाल्याचे म्हणत आहेत.याचबरोबर, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी करत असलेल्या मतचोरीच्या आरोपांवरही त्यांनी टीका केली. फडणवीस यांनी राहुल गांधी यांचे नाव न घेता म्हटले की, “ते आधी परदेशात जाऊन भारताची बदनामी करायचे, आता बिहारमध्ये जाऊन महाराष्ट्राची बदनामी करत आहेत.”या कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले की, “महिलांसाठी आपण अनेक वेगवेगळ्या योजना सुरू केल्या. काही लोक म्हणायचे की या योजना निवडणुकीपूर्वीच आहेत आणि निवडणूक संपल्यानंतर या योजना बंद होतील. निवडणूक होऊन अनेक महिने झाले, तरीही या योजना अजूनही सुरूच आहेत. यातील एकही योजना पुढील पाच वर्षांत आम्ही बंद होऊ देणार नाही. तुमच्या आशीर्वादामुळेच आम्हाला यश मिळाले.”ते पुढे म्हणाले की, “या यशामुळे तुम्ही आनंदी आहात, पण काही जणांचे अजूनही समाधान झालेले नाही. हे रोज मतचोरी झाल्याचे म्हणतात. मतचोरी नाही, तर यांचेच डोके चोरीला गेले आहे. बहिणींना विनंती आहे की, यांना अक्कल यावी यासाठी त्यांच्यासाठीही आशीर्वाद मागा. आमच्या लाडक्या बहिणींच्या मतांना जर हे चोरी म्हणत असतील.

# ओबीसी समाजाला लढाई जिंकायची

## रोटी-बेटी व्यवहार वाढवून आपसांत ऐक्य प्रस्थापित केले पाहिजे

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केल्यापासून ओबीसी समाजातील नेतेही सक्रिय झाले आहेत. त्यातच महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिकांच्या निवडणुका लवकरच होणार असल्याने वेगवेगळ्या विषयांवरुन राजकारण तापण्याची शक्यता आहे.**




### प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर

यावेळी ओबीसी प्रमाणपत्र मार्गदर्शक कैलास आढाव आणि महिला सक्षमीकरण मार्गदर्शक प्रेरणा बलकवडे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रगतीसाठी आधुनिक शिक्षणाची कास धरण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. भिकनप्पा फत्तरफोडे, व्यापारी बँकेचे संचालक निवृत्ती आरिंगळे, मनोहर कोरडे, कैलास आढाव, ज्योती खोले, वर्षा लिंगायत आदी उपस्थित होते.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके तसेच ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी ओबीसी घटकांतील वेगवेगळ्या कार्यक्रमांना उपस्थित राहून ओबीसी समाजाचे ऐक्य कसे आवश्यक आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून जागर लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने नाशिकरोड येथे लिंगायत समाजातील कार्यकर्त्यांचा सुसंवाद, परिसंवाद, खुले चर्चासत्र, मार्गदर्शन व सन्मान सोहळा असा कार्यक्रम छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.या कार्यक्रमात भुजबळ यांनी ओबीसी समाजापुढील आव्हानांचीही मांडणी केली. ओबीसी समाजामध्ये रोटी-बेटी व्यवहार वाढवून आपसांत ऐक्य प्रस्थापित केले पाहिजे. तंत्रज्ञान, जागतिकीकरण, आर्थिक परिवर्तन यांना तोंड द्यावे लागत असल्याने शिक्षणाशिवाय आता पर्याय नाही. फक्त पदव्या घेऊन चालणार नाही. जास्ती जास्त ज्ञान प्राप्त करून उच्चपदावर काम करावे लागेल, असे भुजबळ यांनी सांगितले. टाइपरायटर गेले आणि कॉम्प्युटर आले. प्रत्येकाला कॉम्प्युटर लागतो. डॉक्टर, इंजिनिअर, आणि शेतकऱ्यालाही कॉम्प्युटर लागतो. प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जाती-धर्म एकत्र आणण्याचे कार्य केले.

तज्ज्ञांनी व्यक्त केली भिती

## अर्थव्यवस्थेवर नेमका काय परिणाम होणार?

# अमेरिकेतील स्थलांतरितांच्या संख्येत घट!

## पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात घट

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांची जगात चर्चा सुरू आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेचे दुसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यापासून आतापर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्या निर्णयामध्ये प्रामुख्याने टॅरिफ (आयात शुल्क), बेकायदेशीर स्थलांतरितांच्या मुद्यांसह आदी महत्वाच्या धोरणांचा समावेश आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या काही महिन्यांपासून स्थलांतरितांविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे. एवढंच नाही तर हजारो बेकायदेशीर स्थलांतरितांना अमेरिकेतून हद्दपार देखील करण्यात आलं आहे.**



डोनाल्ड ट्रम्प यांच्या कठोर इमिग्रेशन धोरणांमुळे अमेरिकेतील स्थलांतरितांच्या संख्येत मोठी घट झाल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिकेतील स्थलांतरितांची संख्या १.५ दशलक्ष एवढी कमी झाली असून १९६० नंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात ही घट झाल्याची माहिती समोर आली आहे. प्यू रिसर्च सेंटरचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्या अहवालातून ही माहिती समोर आल्याचं वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.अहवालानुसार, जानेवारी ते जून २०२५ या दरम्यान स्थलांतरितांची संख्या जवळजवळ १.५ दशलक्ष कमी झाली आहे. ज्यामुळे अमेरिकेतील एकूण स्थलांतरितांची संख्या या वर्षाच्या सुरुवातीला ५३.३ दशलक्ष होती ती सुमारे ५१.९ दशलक्ष झाली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्थलांतरितांविरुद्धच्या कडक धोरणाचा हा परिणाम असल्याचं सांगितलं जात आहे. प्यू रिसर्च सेंटरचे वरिष्ठ जेफ्री पासेल यांनी एनबीसी न्यूजशी बोलताना म्हटलं की, “आम्ही ज्या डेटाचा विचार करत आहोत तो एक नाट्यमय बदल दर्शवित आहे.” दरम्यान, या घसरणीचा परिणाम बाजारपेठेतही जाणवत आहे. अहवालानुसार, स्थलांतरितांच्या संख्येत घट झाल्यामुळे ७,५०,००० हून अधिक कामगारांनी काम सोडलं आहे. अमेरिकेतील काम करणाऱ्या लोकांची लोकसंख्या वाढत नाही. याचा अर्थ असा की नवीन स्थलांतरित लोकं येणं हाच एकमेव मार्ग आहे. जर कामगार वाढत नसतील तर ते अर्थव्यवस्थेसाठी कठीण आहे. पण स्थलांतरित लोकसंख्येत झालेली मोठी घट अभूतपूर्व आहे”, असं जेफ्री पासेल यांनी म्हटलं आहे.डोनाल्ड ट्रम्प यांच्या कठोर इमिग्रेशन धोरणांमुळे अमेरिकेतील स्थलांतरितांच्या संख्येत मोठी घट झाल्याची

### संख्या १.५ दशलक्ष कमी

पण स्थलांतरित लोकसंख्येत झालेली मोठी घट अभूतपूर्व आहे”, असं जेफ्री पासेल यांनी म्हटलं आहे.प्यू रिसर्च सेंटरचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्या अहवालातून ही माहिती समोर आल्याचं वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.अहवालानुसार, जानेवारी ते जून २०२५ या दरम्यान स्थलांतरितांची संख्या जवळजवळ १.५ दशलक्ष कमी झाली आहे.

माहिती समोर आली आहे. अमेरिकेतील स्थलांतरितांची संख्या १.५ दशलक्ष एवढी कमी झाली असून १९६० नंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात ही घट झाल्याची माहिती समोर आली आहे. प्यू रिसर्च सेंटरचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्या अहवालातून ही माहिती समोर आल्याचं वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.अहवालानुसार, जानेवारी ते जून २०२५ या दरम्यान स्थलांतरितांची संख्या जवळजवळ १.५ दशलक्ष कमी झाली आहे. ज्यामुळे अमेरिकेतील एकूण स्थलांतरितांची संख्या या वर्षाच्या सुरुवातीला ५३.३ दशलक्ष होती ती सुमारे ५१.९ दशलक्ष झाली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्थलांतरितांविरुद्धच्या कडक धोरणाचा हा परिणाम असल्याचं सांगितलं जात आहे. प्यू रिसर्च सेंटरचे वरिष्ठ जेफ्री पासेल यांनी एनबीसी न्यूजशी बोलताना म्हटलं की, “आम्ही ज्या डेटाचा विचार करत आहोत तो एक नाट्यमय बदल दर्शवित आहे.” दरम्यान, या घसरणीचा परिणाम बाजारपेठेतही जाणवत आहे. अहवालानुसार, स्थलांतरितांच्या संख्येत घट झाल्यामुळे ७,५०,००० हून अधिक कामगारांनी काम सोडलं आहे. अमेरिकेतील काम करणाऱ्या लोकांची लोकसंख्या वाढत नाही. याचा अर्थ असा की नवीन स्थलांतरित लोकं येणं हाच एकमेव मार्ग आहे. जर कामगार वाढत नसतील तर ते अर्थव्यवस्थेसाठी कठीण आहे.

# तुम्हाला कोणी जबरदस्ती केली

## रशियन तेल खरेदीवर टीका करणाऱ्यांना भारताने फटकारले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी शनिवारी रशियासोबतच्या भारताच्या ऊर्जा व्यापाराचे समर्थन केले आणि म्हटले की, भारताची रशियाकडून सुरू असलेली तेल खरेदी राष्ट्रीय आणि जागतिक हितासाठी आहे. इकॉनॉमिक टाईम्स वर्ल्ड लीडर्स फोरममध्ये बोलताना त्यांनी अधोरेखित केले की, अमेरिकेसोबतच्या चर्चेत व्यापार हा ‘अडथळा मुद्दा’ राहिला असला तरी भारत आपले निर्णय स्वतंत्रपणे घेत राहील.**



यावेळी भारतावर रशियन तेल खरेदी करतो म्हणून टीका करणाऱ्यांना उत्तर देताना जयशंकर म्हणाले की, “अमेरिकेतील व्यवसायपूरक प्रशासनासाठी काम करणारे काही लोक इतरांवर नफ्यासाठी व्यापार करत असल्याचा आरोप करत आहेत, हे गंमतीशीर आहे. जर तुम्हाला भारताकडून तेल किंवा तेलप्रक्रिया केलेली उत्पादने खरेदी करण्यात अडचण असेल, तर खरेदी करू नका. यासाठी तुम्हाला कोणीही जबरदस्ती केली नाही. तुम्हाला नको असेल, तर खरेदी करू नका.”यावेळी

### रशियासोबत व्यापार वाढवायचा आहे

जागतिक हिताचेही आहे”, असेही त्यांनी सांगितले. अलास्का बैठकीनंतर रशिया दौऱ्यात झालेल्या चर्चेत भारताच्या रशियाशी असलेल्या संबंधांवर जयशंकर म्हणाले की,“आम्हाला रशियासोबत व्यापार वाढवायचा आहे. भारताची भूमिका अगदी स्पष्ट आहे आणि आम्हाला रशिया-युक्रेन समस्येचा लवकरात लवकर निकाल हवा आहे.”

जयशंकर यांनी नमूद केले की, २०२२ मध्ये जेव्हा तेलाच्या किमती वाढल्या तेव्हा जागतिक स्तरावर चिंता होती.“२०२२ मध्ये, तेलाच्या किमती वाढल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र चिंता होती. त्या वेळी, असे म्हटले जात होते की, जर भारताला रशियन तेल खरेदी करायचे असेल तर ते खरेदी करू द्या, कारण त्यामुळे किंमती स्थिर होतील”, असे ते पुढे म्हणाले. जयशंकर म्हणाले की, भारताची खरेदी आंतरराष्ट्रीय तेल बाजारपेठ स्थिर करण्यासाठी देखील होती. “आम्ही तेलाच्या किमती स्थिर करण्यासाठी तेल खरेदी करत आहोत. हो, ते आमच्या राष्ट्रीय हिताचे आहे.

# १८ वर्षांनंतर अक्षय आणि सैफची जोडी पाहायला मिळणार

'जॉली एलएलबी ३'च्या चर्चेदरम्यान अक्षय कुमारने त्याच्या आणखी एका आगामी चित्रपटाचे शूटिंग सुरू केले आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना १८ वर्षांनंतर अक्षय आणि सैफ अली खानची जोडी पाहायला मिळणार आहे. अलीकडेच या अभिनेत्याने एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो सैफबरोबर शूटिंग सुरू करताना दिसत आहे. खरंतर, अक्षय कुमार आणि सैफ अली खान १८ वर्षांनंतर प्रियदर्शनच्या 'हैवान' चित्रपटात एकत्र दिसणार आहेत, ज्याचे शूटिंगही दोघांनी सुरू केले आहे. त्याचवेळी, अक्षय कुमारने अलीकडेच त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शूटिंगच्या पहिल्या दिवसाचा व्हिडीओ शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये तो सैफ अली खान आणि प्रियदर्शनबरोबर चर्चा करताना दिसत आहे. अक्षयच्या हातात चित्रपटाचे नाव असलेली एक पाटीदेखील दिसत आहे.हा व्हिडीओ चाहत्यांबरोबर शेअर करताना अक्षयने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, "आम्ही सगळे थोडेसे सैतान आहोत... काही बाहेरून सैतान आहेत, तर काही आतून सैतान आहेत.. आज माझा आवडता दिग्दर्शक प्रियदर्शनच्या 'हैवान' चित्रपटाचे शूटिंग सुरू केले आहे. जवळजवळ १८ वर्षांनंतर सैफबरोबर काम करण्यास मी खूप उत्साहित आणि आनंदी आहे. चला 'हैवानियत'ला सुरुवात




करूया." अक्षयची ही पोस्ट आता मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अक्षय आणि सैफने 'मैं खिलाडी तू अनाडी', 'ये दिल्लगी', 'तू चोर मैं सिपाही', 'कीमत' आणि 'टशन'सारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. 'टशन' हा त्यांचा शेवटचा एकत्र चित्रपट होता. इतक्या वर्षांनंतर सैफ आणि अक्षयला एकत्र पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत. व्हिडीओमध्ये सैफ-अक्षयही खूप उत्साही दिसत आहेत. अक्षय लवकरच 'जॉली एलएलबी ३'मध्ये दिसणार आहे. तसेच अक्षय कुमार 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.'जॉली एलएलबी ३' हा चित्रपट पुढील महिन्यात म्हणजेच १९ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात त्याच्याबरोबर अर्शद वारसी असेल. यावेळी दोन्ही जॉली म्हणजे अर्शद वारसी आणि अक्षय एकाच चित्रपटात आहेत, तर सौरभ शुक्ला जज आहेत. अक्षय-अर्शदची जुगलबंदी यामध्ये बघायला मिळणार आहे.

## अदाने नेसली चक्क 15 रुपयांची साडी

'द केरला स्टोरी' चित्रपटातील जबरदस्त अभिनयामुळे अभिनेत्री अदा शर्मा चर्चेत आली. या चित्रपटासाठी अदाला अनेक पुरस्कारदेखील जाहीर झाले आहेत. अदा अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीही चाहत्यांबरोबर शेअर करत असते. अनेकदा अदाने तिच्या नानीचा म्हणजेच आजीचा उल्लेख केला आहे. 'गुलाबी साडी' या मराठमोळ्या गाण्यावर नात अदा आणि तिच्या आजीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अशातच अदाचा आजीशी कनेक्ट असणारा अजून एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आज अदाने खास तिच्या आजीची साडी नेसली होती. आजीची साडी नेसायची अदाची ही काही पहिलीच वेळ नाही. पण, विशेष गोष्ट म्हणजे या साडीची किंमत फक्त १५ रुपये आहे असं ती म्हणाली.

## सोनम ड्रेसमुळे झाली ट्रोल



सोनम कपूर ही फॅशन आयकॉन, फॅशन दिवा या नावांनी इंडस्ट्रीमध्ये प्रचलित आहे. अभिनयाबरोबरच ती आपल्या वेगवेगळ्या लूक्समुळे सतत चर्चेत असते. सोनमनं नुकतीच तिच्या बुक लॉंचला हजेरी लावली होती. या लॉंच सोहळ्याला सोनमने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या या लूकचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.सोनमच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिला ट्रोल केलं आहे. एकानं कमेंट करीत लिहिलं, "दारा सिंगसारखी दिसतेय." तर, "ही नाईट ड्रेसवर का फिरतेय." असं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. "हिचा ड्रेसिंग सेन्स कुठे गेला", असंही एकानं विचारलं. "सोनमनं उशांची कव्हर्स घातली आहेत, असं वाटतंय. जर कोणती गोष्ट सध्या ट्रेंडमध्ये किंवा फॅशनमध्ये असली तरी ती प्रत्येकाला शोभून दिसेल असं नसतंबॉलीवूडमधली फ्लॉप अभिनेत्री" असं एका युजरने लिहिलं. "यापेक्षा वाईट ड्रेस मी आजपर्यंत बघितला नाही.", "चालता फिरता हँगर", "ती हँगरमधून ड्रेस काढायला विसरली" अशा प्रकारच्या ट्रोल्स करणाऱ्या कमेंट्स सोनम कपूरच्या व्हिडीओवर करण्यात आल्यात.

## इंडस्ट्रीतला आऊटसायडर ते आम आदमीचा हिरो!

घरी चित्रपटाशी संबंधित कुणीही नाही, मूळ गाव मुंबानगरीपासून हजारो किलोमीटर दूर हिमाचल प्रदेशात, अल्फा मेल अर्थात पौरुष अवतारी प्रतिमा नाही, सिक्स पॅक ॲब्स नाहीत. चित्तथरारक स्टंट केल्यानंतर ललनांच्या गराड्यात वगैरेही नाही. हिंदी मालिका आणि टीव्ही सृष्टीच्या हिरोच्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पडद्यावर आम आदमी साकारुन त्यालाच नायकत्व देणाऱ्या विक्रांतचा आज वाढदिवस. टीव्ही मालिकांमध्ये काम करू लागल्यानंतर मंडळी तिथेच स्थिरावतात. पण विक्रांतने टीव्ही ते चित्रपट असं स्थित्यंतर केलं. सुरुवातीला पदरी पडलेल्या छोट्या भूमिका चोख निभावत विक्रांतने वाटचाल सुरू ठेवली. 12TH FAIL निमित्ताने विक्रांतला हिरो करणारी कहाणी पडद्यावर आली. चंबळसारख्या दुर्गम भागातून सुरुवात करून थेट प्रशासकीय अधिकारी झालेल्या मनोज शर्मा यांची कारकीर्द विक्रांतने सुरेख साकारली. याचा प्रत्यय चाहत्यांच्या प्रतिक्रिया, पुरस्कार आणि सोशल मीडियावर वाढते फॉलोअर्स यातून सिद्ध होताना दिसत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विक्रांतच्या सफरीचा घेतलेला धांडोळा.विक्रांतचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशमधील शिमल्याचं. त्याच्या वडिलांचं नाव जॉली आणि आईचं नाव आमना आहे. त्याला मोईन नावाचा मोठा भाऊ आहे. त्याच्या वडिलांचं कुटुंब ख्रिश्चन धर्म पाळतं, तर त्याच्या आईचं कुटुंब शीख आहे. विक्रांतच्या आई-बाबांनी पळून जाऊन लग्न केलं होतं, नंतर ते काही काळ विदर्भातील नागभीड इथं राहत होते.

## दियाला गरोदरपणात झाला होतागंभीर आजार



दिया मिर्झा चार वर्षांपूर्वी एका मुलाची आई झाली. तिचा गर्भधारणेचा टप्पा सोपा नव्हता. प्रसूतीच्या वेळी तिला खूप समस्या आल्या. ती एका आठवड्यासाठी तिच्या मुलापासून दूर राहिली आणि स्वतः मृत्यूपासून थोडक्यात बचावली. अलीकडेच दियाने पहिल्यांदाच त्या टप्प्याबद्दल खुलासा केला आहे. दिया मिर्झाने २०२१ मध्ये वैभव रेखीबरोबर दुसरे लग्न केले. लग्नाच्या काही महिन्यांनंतर तिने मुलाला जन्म दिला. वयाच्या ३९ व्या वर्षी आई होणे दियासाठी वेदनादायक होते. तिच्या पोटात संसर्ग झाला होता, ज्यामुळे तिची अकाली प्रसूती झाली.परिस्थिती अशी होती की दिया मिर्झा स्वतः मृत्यूपासून थोडक्यात बचावली. पीपल ऑफ इंडियाशी बोलताना दिया म्हणाली, "मला बॅक्टेरियाचा संसर्ग झाला होता, जो माझ्या अपेंडिक्स शस्त्रक्रियेचा दुष्परिणाम असू शकतो. माझ्या गर्भधारणेच्या पाचव्या महिन्यात माझी शस्त्रक्रिया झाली. माझ्या सहाव्या महिन्याच्या अखेरीस आम्हाला जाणवले की, माझ्या प्लेसेंटामधून रक्तस्त्राव होत आहे आणि माझे शरीर सेप्सिसकडे जात आहे. जर बाळाचा जन्म झाला नसता तर आमच्या दोघांनाही वाचवता आले नसते, ते खूप भयानक होते."दीया मिर्झा मुलाखतीत पुढे म्हणाली की, जेव्हा ती रुग्णालयात गेली तेव्हा तिने स्पष्टपणे सांगितले होते की फक्त तिच्या मुलाला वाचवा. याबद्दल दिया म्हणाली, "त्यांना ४८ तासांनंतर कळले की माझ्या आत असलेले बॅक्टेरिया घातक आहेत. जन्मानंतर ३६ तासांनी अव्यानवर (मुलाचे नाव) जीवनरक्षक शस्त्रक्रिया करावी लागली. माझ्या मुलाच्या आतड्यात छिद्र होते आणि त्याची शस्त्रक्रिया झाली. मुळात आतडे शरीराबाहेर काढण्यात आले होते." दिया मिर्झा म्हणाली की, तिच्या मुलाच्या जन्मानंतर तिला आठवड्यातून फक्त दोनदाच त्याला भेटता येत होते. २० दिवसांनी मुलाला डिस्चार्ज देण्यात आला.

ऑस्ट्रेलिया दौरा

## जैस्वाल सलामीला येणार; टीम इंडियात होणार मोठा बदल

# रोहित कर्णधार, गिलला विश्रांती!

### वनडे संघात मोठा बदल होण्याची शक्यता





। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघ येत्या काही दिवसात आशिया चषक स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. ही स्पर्धा टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेनंतर भारतीय संघ एकही वनडे मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरलेला नाही. १९ ऑक्टोबरपासून रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. या सामन्यासाठी भारतीय संघात मोठे बदल पाहायला मिळू शकतात.**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणाऱ्या वनडे मालिकेतील पहिला सामना १९ ऑक्टोबरला तर दुसरा सामना २३ ऑक्टोबरला आणि तिसरा सामना २५ ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा हे दोघेही या मालिकेतून पुनरागमन करताना दिसून येणार आहेत. विराट आणि रोहित दोघेही वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे विराट आणि रोहित ही मालिका खेळणार की नाही? अशी चर्चा रंगायला सुरूवात झाली आहे.वनडे संघाचं कर्णधारपद रोहित शर्माकडे आहे. युवा फलंदाज शुबमन गिल हा वनडे संघाचा उपकर्णधार आहे. माध्यमातील वृत्तानुसार, शुबमन गिलला या मालिकेतून विश्रांती दिली जाऊ शकते. शुबमन गिलची आशिया चषकासाठी भारतीय टी-२० संघाच्या उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. त्याच्या कामाचा ताण कमी करण्यासाठी त्याला विश्रांती दिली जाऊ शकते. गिलला विश्रांती दिल्यामुळे यशस्वी जैस्वालचं वनडे संघात पुनरागमन करण्याचं दार उघडणार आहे. जैस्वाल आणि रोहित ही जोडी ऑस्ट्रेलियात डावाची सुरूवात करताना दिसून येऊ शकते. तर ऋषभ पंतच्या जागी यष्टीरक्षक फलंदाज म्हणून केएल राहुलला संधी दिली जाऊ शकते. विराट कोहली, श्रेयस अय्यर आणि केएल राहुल हे मधल्या फळीत फलंदाजी करताना दिसू शकतात. या संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांना संधी दिली जाऊ शकते. तर फिरकी गोलंदाज म्हणून कुलदीप यादव, वरूण चक्रवर्ती यांना संधी दिली जाऊ शकते. तर वेगवान गोलंदाज म्हणून जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणाऱ्या वनडे मालिकेतील पहिला सामना १९ ऑक्टोबरला तर दुसरा सामना २३ ऑक्टोबरला आणि तिसरा सामना २५ ऑक्टोबरला खेळवला

### भारतीय संघात बदल

ही स्पर्धा टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेनंतर भारतीय संघ एकही वनडे मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरलेला नाही. १९ ऑक्टोबरपासून रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. या सामन्यासाठी भारतीय संघात मोठे बदल पाहायला मिळू शकतात.

जाणार आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा हे दोघेही या मालिकेतून पुनरागमन करताना दिसून येणार आहेत. विराट आणि रोहित दोघेही वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे विराट आणि रोहित ही मालिका खेळणार की नाही? अशी चर्चा रंगायला सुरूवात झाली आहे.वनडे संघाचं कर्णधारपद रोहित शर्माकडे आहे. युवा फलंदाज शुबमन गिल हा वनडे संघाचा उपकर्णधार आहे. माध्यमातील वृत्तानुसार, शुबमन गिलला या मालिकेतून विश्रांती दिली जाऊ शकते. शुबमन गिलची आशिया चषकासाठी भारतीय टी-२० संघाच्या उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. त्याच्या कामाचा ताण कमी करण्यासाठी त्याला विश्रांती दिली जाऊ शकते. गिलला विश्रांती दिल्यामुळे यशस्वी जैस्वालचं वनडे संघात पुनरागमन करण्याचं दार उघडणार आहे. जैस्वाल आणि रोहित ही जोडी ऑस्ट्रेलियात डावाची सुरूवात करताना दिसून येऊ शकते. तर ऋषभ पंतच्या जागी यष्टीरक्षक फलंदाज म्हणून केएल राहुलला संधी दिली जाऊ शकते. विराट कोहली, श्रेयस अय्यर आणि केएल राहुल हे मधल्या फळीत फलंदाजी करताना दिसू शकतात. या संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांना संधी दिली जाऊ शकते. तर फिरकी गोलंदाज म्हणून कुलदीप यादव, वरूण चक्रवर्ती यांना संधी दिली जाऊ शकते. तर वेगवान गोलंदाज म्हणून जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.भारतीय संघ येत्या काही दिवसात आशिया चषक स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे.

# वीरेंद्र सेहवागची मोठी भविष्यवाणी!

## भारतीय संघ उंचावणार आशिया चषकाची ट्रॉफी : वीरेंद्र सेहवाग





। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेचा बिगुल वाजला आहे. येत्या ९ सप्टेंबरपासून या स्पर्धेला सुरूवात होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेत भारतीय संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे असणार आहे. तर संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे.**

या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान, युएई, ओमान आणि हाँगकाँग असे ८ संघ जेतेपदासाठी भिडताना दिसणार आहेत. दरम्यान भारताचा माजी खेळाडू वीरेंद्र सेहवागने कोणता संघ ही स्पर्धा जिंकणार, याबाबत भविष्यवाणी केली आहे.वीरेंद्र सेहवागने सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर 'रग रग मे भारत' या कार्यक्रमात बोलताना म्हटले की, "यावेळी भारतीय संघात युवा आणि अनुभवी खेळाडूंचे मिश्रण आहे. त्यामुळे सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ आशिया चषकात इतर संघांवर दबाव टाकू शकतो. जर भारतीय संघाने

### यशस्वी जैस्वाल यांना स्थान

आशिया चषकासाठी निवडण्यात आलेल्या संघात श्रेयस अय्यर आणि यशस्वी जैस्वाल यांना स्थान देण्यात आलेलं नाही. दोघांनीही गेल्या काही मालिकांमध्ये आणि आयपीएल स्पर्धेत दमदार कामगिरी केली आहे, असं असतानाही दोघांना या संघात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे अनेक दिग्गज खेळाडूंनी नाराजी देखील व्यक्त केली.

आशिया चषकातही आक्रमक खेळ केला, तर भारतीय संघ जेतेपदाची ट्रॉफी उंचावू शकतो."भारतीय संघ हा आशिया चषक स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ आहे. भारतीय संघाच्या नावे सर्वाधिक ८ वेळेस आशिया चषक स्पर्धेची ट्रॉफी जिंकण्याचा विक्रम आहे. आगामी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा पाहता या स्पर्धेचे आयोजन टी-२० फॉरमॅटमध्ये केले जाणार आहे. त्यामुळे सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे. सूर्यकुमार यादव पहिल्यांदाच मोठ्या स्पर्धेत भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसून येणार आहे.

स्मार्ट PCMC

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार ।

। दि. 24 ऑगस्ट 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ‘कमळ’ फुलणार की ‘घड्याळ’चा गजर?

## ग्राऊंड रिपोर्ट : प्रभाग क्रमांक 1 मध्ये भाजपा- राष्ट्रवादीची ताकद तुल्यबळ

। पिंपरी-चिंचवड । अविनाश आदक । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने “महाईन्यूज” च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण “ग्राऊंड रिपोर्ट” करणार आहोत.**





“ गेल्या १० वर्षांत भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून संतपीठ, डीपी रस्ते, पोलीस आयुक्तालय सारखे महत्त्वाकांक्षी विकासकामे झाली आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वात या भागाचा कायापालट झाला असून, या भाजपाला जनाधार आहे.

- कुंदन गायकवाड, भाजपा.



“ स्व. दत्ताकाका साने यांनी 15 वर्षे या प्रभागाचे नेतृत्त्व केले आहे. राष्ट्रवादीची ताकद प्रभागामध्ये जास्त आहे. आरक्षण सोडतीनंतर चित्र स्पष्ट होईल. पण, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात आम्ही निवडणूक यशस्वीपणे जिंकणार आहोत.

- यश साने, राष्ट्रवादी.

महापालिका प्रारुप प्रभाग रचना शुक्रवारी प्रसिद्ध झाली. 2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग “रचना जैसे थे” आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये मोरे वस्ती आणि सोनवणे वस्तीतील काही किरकोळ बदल वगळता प्रभागात कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 57 हजार 149 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 7 हजार 759 इतकी अनुसूचित जाती आणि 751 इतिक अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये या प्रभागामध्ये भाजपाची मोठी लाट असतानाही राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत विरोधी पक्षनेते दत्ताकाका साने निवडून आले होते. भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे एकेकाळी कट्टर समर्थक असलेल्या दत्ताकाकांनी 2017 च्या निवडणुकीनंतर महेश लांडगे यांचा प्रखर विरोधाची भूमिका घेतली. दत्ताकाका यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा यश साने सक्रीय झाले आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून यश साने निवडणुकीच्या रिंगणात उतरतील किंवा त्यांच्या मातोश्रीसुद्धा उमेदवार असतील अशी चर्चा आहे. पण, यश साने लढण्यावर ठाम आहेत. दुसरीकडे, अजित पवार गटाचे विकास साने यांनीही तयारी केली आहे.


2017 च्या आरक्षणानुसार, अ- अनुसूचित जाती, ब- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग- महिला, क- सर्वसाधारण महिला आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला 50 टक्के आरक्षण आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ओबीसी आरक्षण पूर्ववत ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आरक्षणामध्ये काही फार बदल होईल, असे चित्र नाही.

भारतीय जनता पार्टीकडून 2017 मध्ये कुंदन गायकवाड, स्वीनल म्हेत्रे, अलका मोरे आणि पांडूरंग साने यांनी निवडणूक लढवली होती. यापैकी कुंदन गायकवाड आणि स्वीनल म्हेत्रे यांनी बाजी मारली. तर अलका मोरे आणि पांडुरंग साने यांना पराभव पत्कारावा लागला होता. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसकडून दत्ताकाका साने यांनी निवडणूक जिंकली. त्यांना सर्वाधिक 9 हजार 926 इतकी मते मिळाली होती. तसेच, क- गटातील सर्वसाधारण महिला जागेवर साधना मळेकर यांनी विजय मिळवला होता.

2014, 2019 आणि 2024 च्या विधानसभा निवडणुकीचा विचार करता या प्रभागातून आमदार महेश लांडगे यांना 2024 च्या निवडणुकीत 8 हजार 500 हून अधिक मतांची आघाडी मिळाली होती. त्यामुळे प्रभागामध्ये दिवंगत दत्ताकाकांची पुण्याई की आमदार महेश लांडगे यांची जादू चालणार? हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

### प्रभागातील समाविष्ट भाग

चिखली गावठाण भाग, पाटीलनगर, गणेशनगर, मोरेवस्ती भाग, सोनवणे वस्ती इत्यादी., ऐश्वर्यम कोर्टयार्ड, शाईन सिटी इमारत इ.




### 2017 मधील विजयी उमेदवार :

| | | |
|---|---|---|
| अ | कुंदन गायकवाड | भाजपा |
| ब | स्वीनल म्हेत्रे | भाजपा |
| क | साधना मळेकर | अपक्ष |
| ड | स्व. दत्तात्रय साने | राष्ट्रवादी (अ.प.) |

### पक्षनिहाय इच्छुकांची नावे

1. भारतीय जनता पार्टी : कुंदन गायकवाड, साधना मळेकर, गणेश मळेकर, विनायक मोरे, सोनम मोरे, पांडुरंग साने, जितेंद्र यादव, सुरेश म्हेत्रे, स्वीनल म्हेत्रे.

2. राष्ट्रवादी अ.प. गट : यश साने, विकास साने, तृप्ती मोरे, विनायक रणसुबे, स्वप्नील रोकडे.

3. शिवसेना शिंदे गट : राहुल भोसले.

4. राष्ट्रवादी श.प. गट : अमृत सोनवणे

5. शिवसेना उबाठा गट : नेताजी काशिद.

6. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस : अद्याप कोणी नाही.

## शिक्षण विश्व: विद्या व्हॅली नॉर्थ पॉईंट स्कूलमध्ये पर्यावरणपूरक उपक्रम

# ईको-फ्रेंडली गणेश मूर्ती कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

### पर्यावरण रक्षणाचे भान ठेवून पारंपरिक सण साजरे करण्याच्या उद्देशाने कार्यशाळा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विद्या व्हॅली नॉर्थ पॉईंट स्कूलमध्ये पार पडलेली ईको-फ्रेंडली गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी एक प्रेरणादायी अनुभव ठरली. पर्यावरण रक्षणाचे भान ठेवून पारंपरिक सण साजरे करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**




शाडू मातीचा वापर करून गणेश मूर्ती साकारण्याच्या या उपक्रमात सुमारे ५० विद्यार्थी व पालक सहभागी झाले. गणेशमूर्ती घडवताना विद्यार्थ्यांनी सौंदर्य, श्रद्धा आणि सर्जनशीलतेचा संगम अनुभवला. मातीचा गंध, हसऱ्या चेहेऱ्यांचा उत्साह, आणि गणपती बाप्पा मोरया या घोषणांनी कार्यशाळेला एक आनंदमय, भक्तिभावपूर्ण वातावरण लाभले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ कलात्मकतेस चालना मिळाली नाही, तर पर्यावरणपूरक जीवनशैली आणि सामाजिक जबाबदारी यांचे मोलाचे धडेही मिळाले.

प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी शाडू मातीचा पर्याय निवडून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्याचे महत्त्व कार्यशाळेच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनामागे शाळेच्या प्राचार्या पल्लवी शिंदे, शिक्षकवर्ग आणि सहाय्यक कर्मचारी वर्गाचे सहकार्य मोलाचे ठरले.

प्राचार्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सर्जनशीलता आणि संवेदनशीलता यांचे रोपण करण्यावर भर दिला.

ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरली. यातून कला, संस्कृती, पर्यावरण आणि आनंद यांचा सुंदर संगम घडून आला असे प्राचार्य शिंदे यांनी सांगितले.

---

## रहाटणीतील एसएनबीपी स्कूलचे कराटेमध्ये घवघवीत यश!

### स्वातंत्र्य दिनानिमित्त इंडिपेंडन्स कप स्पर्धेत सर्वाधिक सुवर्णपदकांचा बहुमान

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवडच्या रहाटणी येथील एसएनबीपी स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित कराटे इंडिपेंडन्स कप स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश मिळवले आहे.**

या स्पर्धा शत्रुघ्न काटे स्पोर्ट्स यांच्या वतीने आयोजित करण्यात आल्या होत्या.

रहाटणी आणि पिंपळे सौदागर परिसरातील अनेक कराटेपटूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. विविध वयोगटांतील स्पर्धांमध्ये एसएनबीपी स्कूलने सर्वाधिक सुवर्णपदके जिंकण्याचा मान मिळवला.

या यशासाठी शाळेचे अध्यक्ष डी.के. भोसले आणि जयश्री व्यंकटरमण यांचे मार्गदर्शन लाभले, तर सुमित थापा यांनी स्पर्धांच्या आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. शाळा प्रशासनाने विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून, त्यांच्या कामगिरीने परिसराचा मान उंचावला आहे.



# डॉ. अविनाश चोरे यांना पीएच.डी. पदवी प्रदान!

## शिक्षण विश्व; भाषांतर तंत्रज्ञानात नवे योगदान



।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील परीक्षा नियंत्रक व सहाय्यक प्राध्यापक डॉ. अविनाश गोधराम चोरे यांना नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असून, त्यांच्या संशोधन कार्याने आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि भाषिक तंत्रज्ञान क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.**

डॉ. चोरे यांनी "डीप लर्निंग व मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून व्यक्तीची भाषा ओळखून तिचे भाषांतर करणारे अभिनव मॉडेल डिझाईन व इम्प्लिमेंट" या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी विकसित केलेले मॉडेल ध्वनी, मजकूर आणि प्रतिमा या मल्टिमोडल इनपुट्सच्या आधारे भाषा ओळखते आणि तात्काळ भाषांतरित करते.

या तंत्रज्ञानामुळे बहुभाषिक संवाद अधिक सुलभ होणार असून, शैक्षणिक, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रात सकारात्मक परिणाम अपेक्षित आहेत.

### भाषांतर तंत्रज्ञानात नवे योगदान

**संशोधनाचा विषय:**

"डीप लर्निंग व मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून व्यक्तीची भाषा ओळखून तिचे भाषांतर करणारे अभिनव मॉडेल डिझाईन व इम्प्लिमेंट"

**मुख्य वैशिष्ट्ये:**

ध्वनी, मजकूर आणि प्रतिमा या मल्टिमोडल इनपुट्सवर आधारित भाषा ओळख.

तात्काळ भाषांतराची सुविधा.

बहुभाषिक संवाद अधिक सुलभ करण्यास मदत.

शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रात या तंत्रज्ञानामुळे संवादाची कार्यक्षमता वाढणार आहे.

संस्थेचे पदाधिकारी, सहकारी व विद्यार्थी वर्गाकडून डॉ. चोरे यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# डॉ. शितल वैभव घोटेकर यांना पीएच.डी. पदवी

## शिक्षण विश्व: "डीप लर्निंग" च्या साहाय्याने संगीत क्षेत्रात अभिनव संशोधन

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड :श्री सत्य साई युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँड मेडिकल सायन्सेस, सीहोर, मध्य प्रदेश येथून शितल वैभव घोटेकर यांनी "डीप लर्निंग च्या साहाय्याने विविध तारवाद्य वाद्यांच्या ध्वनींचे बहुवर्गीय वर्गीकरण करण्याची अभिनव पद्धत" या विषयावर यशस्वी संशोधन पूर्ण करून डॉक्टरेट (PH.D.) पदवी प्राप्त केली आहे.**

या संशोधनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संगीत यांचा संगम साधत, विविध भारतीय आणि सतार, व्हायोलिन, गिटार अशा पाश्चात्य तारवाद्य वाद्यांचे ध्वनी नमुने संगणक प्रणालीद्वारे विश्लेषित करून, त्या वाद्यांचे अचूक वर्गीकरण करण्याची पद्धत विकसित करण्यात आली आहे. या संशोधनासाठी डीप लर्निंगच्या आधुनिक तंत्रांचा – विशेषतः कॉनव्होल्यूशनल न्यूरल नेटवर्क्स आणि लाँग शॉर्ट-टर्म मेमरीचा वापर करण्यात आला.

या संशोधनामुळे संगीत शिक्षण, संगणकाधारित संगीत विश्लेषण प्रणाली, डिजिटल वाद्य ओळख प्रणाली, तसेच भारतीय संगीत वारशाच्या संवर्धनासाठी नवे मार्ग मोकळे होतील, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. वाद्य ओळख प्रणाली, ऑटोमेटेड म्युझिक ट्रान्सक्रिप्शन आणि स्मार्ट म्युझिक ॲप्लिकेशन्स अशा क्षेत्रांमध्ये या संशोधनाचा उपयोग होण्याची मोठी शक्यता आहे.

डॉ. शितल घोटेकर यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक व सांगीतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून डॉ. घोटेकर यांना प्रोत्साहन व मार्गदर्शन देणाऱ्या संबंधित प्राध्यापकांचे देखील विशेष योगदान आहे.

डॉ. शितल वैभव घोटेकर यांनी आपल्या यशाचे श्रेय आपल्या कुटुंबीय, मार्गदर्शक, सहकारी संशोधक आणि संगीत क्षेत्रातील प्रेरणास्त्रोतांना दिले आहे. भविष्यात संगीत व कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा अधिक सखोल अभ्यास करून या क्षेत्रात योगदान देण्याचा त्यांचा मानस आहे.



Pune District Education Association's

# Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy

Saswad, Pune - 412301

D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

**"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"**

**Confirm Your Application Now!**



- Visit Us for Physical Scrutiny
- PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
- Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
- Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549